आमदार स्थानिक विकास कार्यक्रम
सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात समर्पित निधी सन २०१९-२०मध्ये लेखाशिर्ष ४५१५००१२ अंतर्गत जिल्हानिहाय उपलब्ध करून देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन ज्ञापन क्र. स्थाविका-०५१९/प्र.क्र. ५६/का-१४८२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १ ऑगस्ट, २०१९

वाचा:- १) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक- स्थाविका-०५१९/प्र.क्र. ५६/का-१४८२, दि१२.७.२०१६
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.पूरक-२०१८/प्र.क्र.९५/अर्थ-३, दिनांक ९.७.२०१९

ज्ञापन :-

महाराष्ट्र विधानमंडळाने, “महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०१९” मंजूर केले असून ते महाराष्ट्राचे राज्यपाल महोदय यांच्या अधिसंमतीनुसार महाराष्ट्र अधिनियम क्र. ९ म्हणून, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक ८ जुलै, २०१९ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाकरीता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकूण रु. ९५६.६२ कोटी इतका निधी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आला होता. त्यापैकी माहे ३१ मार्च, २०१९ अखेर झालेला खर्च वजा जाता जिल्हयांनी शासनास समर्पित केलेल्या निधीपैकी जिल्हयांनी मागणी केल्यानुसार रु. २८१,०३,७४,०००/- (रु. दोनशे एक्क्याऐंशी कोटी तीन लक्ष चौऱ्याहत्तर हजार फक्त) इतका निधी सन २०१९-२० मध्ये पुन्हा उपलब्ध करुन देण्यासाठी विधानमंडळाच्या जून, २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात पूरक मागणी मंजूर करण्यात आलेली आहे.

३. वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ येथील शासन परिपत्रकान्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेला निधी वितरीत करण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत केलेला निधी वितरीत करण्यापूर्वी वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक असल्याने प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता. त्यास शासनाने दिलेल्या मंजूरीनुसार व जिल्हयांकडून प्राप्त मागणीनुसार रु. २८१,०३,७४,०००/- (रु. दोनशे एक्क्याऐंशी कोटी तीन लक्ष चौऱ्याहत्तर हजार फक्त) एवढा निधी सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे या ज्ञापनान्वये सुपूर्द करण्यात येत आहे. सदर निधी बीम्स संगणक प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आला आहे. या निधीचे पुढील वितरण संदर्भाधीन शासन निर्णय, नियोजन विभाग दिनांक १२.७.२०१६ मधील तरतूदीच्या अधिन राहून तात्काळ करावे. सदर निधीमधून खर्च करतांना वित्त विभागाच्या दिनांक ९.७.२०१९ च्या परिपत्रकांमधील

तसेच वित्त विभागाने वेळोवळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित निकष व वित्तीय अधिकारांचे प्रत्यायोजन इ. चे काटेकोरपणे पालन करावे.

४. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाकरीता सन २०१८-१९ या अर्थिक वर्षासाठी यापूर्वी वितरीत केलेल्या व या ज्ञापनान्वये मंजूर केलेल्या निधीचा विनियोग दिनांक ३१ मार्च, २०२० पूर्वी पूर्णपणे होईल, याची जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी. तसेच या निधीमधून झालेल्या खर्चाचा ताळमेळ विहित वेळेत पूर्ण करुन उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी. तसेच वर्षअखेर बचत संभवत असल्यास त्या बचतीची कारणे देऊन सदर बचत आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी शासनास समर्पित करण्याची दक्षता घ्यावी.

५. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेला निधी खालील लेखाशिर्षांतर्गत खर्च करण्यात यावा.

मागणी क्रमांक ओ-१०
४५१५- इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
१०२ सामुहिक विकास
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना
(१) बहुउद्देशीय कार्यक्रम
(००) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम
(४५१५ ००१२) (कार्यक्रमांतर्गत) (दत्तमत) ५३ मोठी बांधकामे

६. सदर ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौ.सं क्र. २३६/२०१९/व्यय-८/२०१८, दिनांक २२ जुलै, २०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०८०११६०७२८३८१६ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: CN = VIJESING FATTESING VASAVE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = PLANNING DEPARTMENT
Date: 2019.08.01 16:14:04 +05'30'

सोबत: विवरणपत्र

(वि.फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव
३. महालेखापाल (लेखापरिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर,

४. जिल्हाधिकारी, (सर्व)
५. उपायुक्त (नियोजन), कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
६. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
७. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
९. वित्त विभाग (अर्थ-१६ / व्यय- ८)
१०. नियोजन विभाग, का-१४२४,
११. निवडनस्ती, का-१४८२, नियोजन विभाग.

शासन ज्ञापन क्र. स्थाविका-०५१९/प्र.क्र. ५६ /का.१४८२, दि. १ ऑगस्ट, २०१९ चे सहपत्र		
अ.क्र.	जिल्हा	सन २०१८-१९ मध्ये समर्पित निधीपैकी सन २०१९-२० मध्ये पुन्हा उपलब्ध करुन दिलेला निधी (रु. हजारांत)
१	२	३
१	मुंबई शहर	२३१७८२
२	मुंबई उपनगर	७५४२७
३	ठाणे	४०८८०
४	पालघर	३०५७०
५	रायगड	७६१९२
६	रत्नागिरी	४८३६
७	सिंधुदुर्ग	३०४१५
८	नाशिक	१९९०५१
९	धुळे	३९४९७
१०	नंदुरबार	१४९११
११	जळगांव	७६५४२
१२	अहमदनगर	८१२४४
१३	पुणे	२२१६३७
१४	सातारा	२३७६७
१५	सांगली	८०४४६
१६	सोलापूर	२२९२६२
१७	कोल्हापूर	१९७८९
१८	औरंगाबाद	१९९५९६
१९	जालना	५२३०६
२०	बीड	१८०८००
२१	परभणी	४८०५८
२२	हिंगोली	५८४०७
२३	नांदेड	४६१५५
२४	उस्मानाबाद	११८२८०
२५	लातूर	१३५१७८
२६	बुलडाणा	९७३७५
२७	अकोला	५००९३
२८	वाशिम	३६४७०
२९	अमरावती	८८१८८
३०	यवतमाळ	८३७९९
३१	नागपूर	२५०९१
३२	वर्धा	२०२६७
३३	भंडारा	१३२३४
३४	गोंदिया	१९६८०
३५	चंद्रपूर	३६४७७
३६	गडचिरोली	२४६७२
	एकूण	**२८१०३७४**

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: CN = VIJESING FATTESING VASAVE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = PLANNING DEPARTMENT
Date: 2019.08.01 16:14:33 +05'30'

(वि.फ. वसावे)

उप सचिव. महाराष्ट्र शासन